स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**मुख्य कार्यालय, विरार**
**विरार (पुर्व),**
**ता. वसई, जि. पालघर, पिन 401 305.**

**दुरध्वनी : 0250-2525105/06/2529888/2529890**
**फॅक्स : 0250-2525107**
**ई-मेल : vasaivirarcorporation@yahoo.com**

**जावक क्र. : व.वि.श.म./ /**
**दिनांक :**

प्रेसनोट

वसई विरार शहर महानगरपालिका हद्दीमध्ये सार्वजनिक गणेशोत्सव साजरा करत असताना महानगरपालिकामार्फत नाविन्यपूर्वक उपक्रम हाती घेण्यात येत आहे. त्याचाच एक भाग म्हणून मा.मुख्यमंत्री महोदय यांच्या निर्देशानुसार सार्वजनिक गणेशोत्सव साठी परवानगीबाबत एक खिडकी (Single Window) कक्ष राबविण्यात येत आहे. जेणेकरून गणेशोत्सव मंडळांना सर्व विभागाच्या परवानगीसाठी वेगवेगळया कार्यालयात जाऊन स्वतंत्र अर्ज करण्याऐवजी महापालिकेमार्फत तयार करण्यात आलेल्या एक खिडकी (Single Window) कक्षामध्ये अर्ज करता येईल, जेणेकरून गणेशोत्सव मंडळांना कमीतकमी वेळेत सर्व परवानग्या एका छताखाली मिळतील.

तसेच महानगरपालिका मार्फत सदर परवानगीसाठी मागील वर्षापासून Online सूविधा उपलब्ध करून देण्यात आलेली आहे. मागील वर्षी एकूण २६३ गणेशोत्सव मंडळांना ऑनलाईन प्रक्रियेद्वारे परवानगी देण्यात आली होती. सर्व गणेशोत्सव मंडळ यांनी https://vvcmcpandalpermission.com/ या Link द्वारे अथवा QR code द्वारे Login केल्यानंतर सदर पोर्टलवर (Portal) गणेशोत्सव मंडळांच्या अर्जाची नोंदणी केली जाईल. तद्नंतर सदर अर्जाची महानगरपालिकेमार्फत प्राथमिक तपासणी करून संबंधित इतर विभाग जसे पोलीस विभाग, वाहतुक नियंत्रण शाखा, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी व अग्निशमन विभाग यांच्याकडे पुढील कार्यवाहीसाठी पोर्टलद्वारे पाठविला जाईल. संबंधित विभागाकडून या बाबत आवश्यक ती तपासणी / शहानिशा करुन त्यांच्याकडील परवानगी / ना हरकत प्रमाणपत्र पोर्टलवर सादर केले जाईल. सर्व विभागांचे ना हरकत प्रमाणपत्र प्राप्त झाल्यानंतर महानगरपालिकेमार्फत संबंधित अर्जदार/गणेशोत्सव मंडळ यांना Online portal द्वारे परवानगी दिली जाईल. याकरीता कोणतेही शुल्क आकारण्यात येणार नाही.

सदरची संपूर्ण प्रक्रियाही Online स्वरूपाची आल्यामुळे गणेशोत्सव मंडळांना कोणत्याही विभागाकडे वारंवार हेलपाटे मारण्याची आवश्यकता नाही. त्यामुळे त्यांचे श्रम व वेळ दोन्हींची बचत होणार आहे. सदर परवानगी प्रक्रियेसाठी संबंधित एक खिडकी (Single Window) कक्षामध्ये गणेशोत्सव मंडळांना सदरचा अर्ज भरताना मार्गदर्शन / मदत करण्यासाठी महानगरपालिकेमार्फत कार्यालयीन अधिक्षक व संगणक ऑपरेटर कार्यालयीन वेळेत उपस्थित असतील.

महानगरपालिका क्षेत्रातील प्रत्येक प्रभाग समिती स्थरावर सदरची एक खिडकी (Single Window) कक्ष तयार करण्यात आलेले आहेत. तरी सर्व गणेशोत्सव मंडळांनी सदर सेवेचा लाभ घ्यावा असे आवाहन महानगरपालिकेमार्फत करण्यात येत आहे.

सही/-
(समीर भुमकर)
उपायुक्त
माहिती तंत्रज्ञान विभाग
वसई विरार शहर महानगरपालिका

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**मुख्य कार्यालय, विरार**
**विरार (प),**
**ता. वसई, जि. पालघर, पिन 401 303.**

**दुरध्वनी : 0250-2525105/06/2529888/2529890**
**फॅक्स : 0250-2525107**
**ई-मेल : vasaivirarcorporation@yahoo.com**

**जावक क्र. : व.वि.श.म./ /**
**दिनांक :**

## प्रेस नोट

## "शहरातील बेवारस वाहनांवर कारवाई होणार"

वसई विरार शहर महानगरपालिका क्षेत्रात अनेक ठिकाणी रस्त्यांवर दुर्तफा बेवारस वाहने पडुन असल्याचे दिसुन येत आहे. अशा बेवारस वाहनांमुळे रहदारीस अडथळा निर्माण होतो. रस्त्याची रुंदी कमी होवुन वाहतुक कोंडी होते. परिणामी त्याचा त्रास वाहनांमधुन प्रवास करणाऱ्या प्रवाशांना होतो व ते इच्छित ठिकाणी पोहचण्यास उशिर लागतो. तसेच सदरची बेवारस वाहने एकाच जागी अनेक दिवसापासून पडून राहील्यामुळे त्यावर धुळ साचते. त्यामुळे नागरिकांना या धुळीचा ही त्रास होतो. या वाहनांच्या खाली व आजुबाजुच्या परिसरात रस्ता साफ-सफाईच्या कर्मचाऱ्यांना रस्ता साफ करताना अडचण निर्माण होते. व त्या ठिकाणी कचरा साचुन वातावरणात दुर्गंधी पसरते. परिणामी वातावरणाचा समतोल बिघडतो व नागरिकांना त्याचा त्रास होतो. या सर्व बाबींचा विचार करुन महानगरपालिकेचे आयुक्त श्री. अनिकुमार पवार यांनी नागरिकांच्या हिताच्या दृष्टीने या बेवारस वाहनांवरती कायदेशीर कारवाई करणेचे निश्चित केलेले आहे.

"महानगरपालिका अधिनियम 1949 चे कलम 230 व 231 अन्वये" सदर वाहनांवर कडक कारवाई करणेत येणार आहे. याकामी सर्व प्रभाग समिती क्षेत्रातील बेवारस वाहनांचे प्रभाग निहाय सर्व्हेक्षण करणेत आलेले असुन प्रभाग समिती 'ए' ते 'आय' या क्षेत्रात अंदाजे 443 बेवारस वाहने असुन सदर वाहनांवर दि. 12 फेब्रुवारी 2025 पासुन कारवाई करणेत येणार आहे.

सदरची कारवाई टाळण्यासाठी ज्या नागरिकांनी आपली वाहने सार्वजनिक रस्त्यावर बेवारस अवस्थेत ठेवलेली असतील त्यांनी ती दि. 10 फेब्रुवारी 2025 पर्यंत हटविण्यात यावी. अन्यथा अशा बेवारस वाहनांवर कारवाई करणेत येणार आहे. याची नोंद घ्यावी.

मुख्य कार्यालय विरार
वसई विरार शहर महानगरपालिका

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**मुख्य कार्यालय, विरार**
**विरार (प),**
**ता. वसई, जि. पालघर, पिन 401 303.**

दुरध्वनी : 0250-2525105/06/2529888/2529890
फॅक्स : 0250-2525107
ई-मेल : vasaivirarcorporation@yahoo.com

जावक क्र. : व.वि.श.म./ /
दिनांक :

प्रेसनोट

**फनस्ट्रीट सनडे ला उत्फुर्त प्रतिसाद**
**मुला बरोबरच जेष्ठ हि रमले विविध खेळात**

वसई विरार शहर महानगरपालिका क्रीडा विभाग ,जागरुक नागरिक संस्था वसई व नारी प्रेरणा प्रतिष्ठान यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित फनस्ट्रीट सनडे हा कार्यक्रम रविवारी पार पडला या कार्यक्रमात एरव्ही मोबाईलवर रमणारी मुले विविध खेळात रमल्याचे चित्र दिसले. तर जेष्टानीही पुन्हा एकदा आपले बालपण अनुभवले. या कार्यक्रमाला नालासोपारा मतदार संघाचे आमदार राजन नाईक, माजी नगरसेवक प्रविण म्हाप्रळकर,क्रीडा विभाग सहाय्यक आयुक्त ग्लिसन घोन्साल्वीस, प्रभाग समिती ई च्या सहाय्यक आयुक्त अश्विनी मोरे, सहाय्यक आयुक्त शशिकांत पाटील, सहाय्यक आयुक्त अजय चौकेकर, जेएनएस संस्थेतर्फे अध्वरी कुलकर्णी, नारी प्रेरणा प्रतिष्ठान च्या अध्यक्षा अंकिता नाईक, क्रीडा विभागाचे गणेश पाटील, दिगंबर पाटील आदि उपस्थित होते.

नालासोपारा येथे आयोजित केलेल्या या कार्यक्रमात सहभागी हजारों नागरिक व विद्यार्थी यांना आपले बालपण पुन्हा एकदा अनुभवायला मिळालें. मनमोकळेपणाने जेष्ठ विविध खेळात भाग घेऊन आपल्या जुन्या आवडी पुन्हा एकदा जगताना दिसत होते. मुले तर हातातील मोबाईल बाजूला ठेऊन खेळत होती . पण त्याच वेळी महिलाही आपल्यातील विविध कलागुण दाखवत होत्या. कोणी दोरीवरील उड्या मारत होत्या तर कोणी सायकलिंगचा आनंद घेत होत्या. आज झालेल्या फनस्ट्रीट मध्ये मलखांब,महिलांसाठी मंगळागौर,भजन ,स्केटिंग,कराटे, झुम्बा ,सायकलिंग ,दोरी उड्या , चित्रकला,कॅलिग्राफी,याने सार्‍यांचे लक्ष वेधून घेतले होते. पहिल्यांदाच नालासोपारा येथे आयोजित केलेल्या फनस्ट्रीट या उपक्रमाला आमदार राजन नाईक यांनी शुभेच्छा दिल्या व असेच नाविन्यपूर्ण उपक्रम वसई विरार शहर महानगरपालिकेच्या वतीने नागरिकांकरीता राबविले जातील असे आश्वासन दिले.

तर आता दरवर्षी प्रमाणे रविवार 16 फेब्रुवारी ला देखील वसईतील दत्तानी मॉल येथील रस्त्यावर फनस्ट्रीट सनडे चे आयोजन महापालिका व विविध सेवा भावी संस्थांच्या सहकार्याने करण्यांत आले आहे.

क्रीडा विभाग
वसई विरार शहर महानगरपालिका